# राशिभविष्य - मार्च, २०१३.

दादा दामले (dadadamle@gmail.com)

==========================================================

**(१) मेष -** या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल असणार आहे. त्यामुळे त्यांनी महिन्याच्या पूर्वार्धातच जे काही साधावयाचे ते साधून घेण्याचा अटोकाट प्रयत्न करावा. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना बढती, उच्च पद, मानाचे स्थान, अर्थलाभ अशापैकी विविध प्रकारचे लाभ होण्याची शक्यता आहे. कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. मन:शान्ति मिळेल. काहीना नवे मित्र मिळतील. या राशीच्या स्वतंत्र व्यापार-व्यवसाय करत असणारांनीही महिन्याच्या पूर्वार्धातच प्रगती व व्यवसायवाढ करण्याचा प्रयत्न करावा. अर्थलाभ होणारच आहे; तरीही आर्थिक घोटाळे, येणे येण्यास विलंब, कुमार्गी सल्लागारांपासून नुकसान संभवते. जपा. कुटुंबात शुभ घटना घडतील. महिन्याच्या उत्तरार्धात सतत मनाविरुद्ध घटना घडून पराजय, चिंता यांमुळे नैराश्य येणे संभवते. मंगळ ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असल्यामुळे गैरसमजुती, भांडणे अर्थहानी, मानहानी होईल व त्यामुळे मन अस्वस्थ राहील. काही जुनी दबलेली मनस्ताप देणारी प्रकरणे असतील तर त्यांचा पुन्हा त्रास होणेही संभवते. अशा परिस्थितीत गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व जीवन सुसह्य होईल. जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे वा अन्य कारणामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे शक्य दिसते. वाममार्ग धन सहज मिळणे शक्य असले तरी कटाक्षाने तो मोह टाळाच. होत्याचे नव्हते होईल. श्रद्धा असेल तर तर श्रीगणेश उपासना व " ओम गं गणपतये नम: " मंत्राचा जप करा. अनुकुल होईल.

**(२) वृषभ -** या राशीच्या शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना नोकरीच्या दृष्टीने महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल होईल. महिन्याच्या उत्तरार्धात काही मंडळीना बढती, अर्थलाभ, उच्च पद असे काही मिळण्याची शक्यता आहे. शिक्षण, साहित्य, चिकित्सक बौद्धिक व्यवसाय, शास्त्रीय संशोधन क्षेत्र असे कर्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल व प्रगतिकारक होईल. पण कलाक्षेत्र व यांत्रिक तांत्रिक व्यवसाय असणारांना मात्र व्यवसायातील अस्थिर परिस्थितीमुळे अडचणी सहन करून कष्ट व परिश्रमानेच अपेक्षित अर्थप्राप्ती करून घ्यावी लागेल. या राशीच्या व्यापारी मंडळीना परधर्मीय ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या काही मंडळीना कौटुंबिक सुखसमाधानाबरोबरच अनपेक्षित अर्थलाभ किंवा मौल्यवान वस्तूंचा लाभ होणे संभवते. त्यामुळे मन:शांति लाभेल. गुरुकृपेने आरोग्य उत्तम राहील. पण काही मंडळीना उष्णताविकाराचा तर काही मंडळीना वातपित्तविकारांचा त्रास होणे संभवते. तसेच लहरी स्वभावामुळे अयोग्य आचरण झाल्यास पश्चात्ताप करावा लागेल. जपा. दिनांक १-२ व दिनांक २८-२९ या चार दिवशी असह्य मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता दिसते. जपा. गैरसमजाने वाद, भांडणे होऊन मैत्रीत बाधा येणे शक्य आहे. जपा. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल. विशेष करून कलाक्षेत्रातील विद्यार्थ्यांना व व्यावसायिकांना महिन्याचा उत्तरार्ध अधिक अनुकुल व लाभदायक होईल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल.

**(३) मिथुन -** या राशीच्या मंडळीना आध्यात्मिक प्रगतीच्या दृष्टीने काळ अनुकुल असल्यामुळे उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती साधणे सहज शक्य होईल. तसेच सामाजिक कार्यात रस

असणारांना सामाजिक कार्यात प्रगती साधता येईल. थोरामोठ्यांचे आशीर्वाद प्राप्त होतील. मात्र महिन्याच्या पूर्वार्धात रवि-बुध प्रतिकुल असल्यामुळे दिरंगाई, विरोध असे अडथळे सहन करूनच प्रगती साधावी लागेल. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना महिन्याचा उत्तरार्धच अधिक अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. चिकित्सक बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र, वकिली व्यवसाय, राजकारण असे कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल व यशदायक असा सिद्ध होईल. यांत्रिकतांत्रिक नोकरी-व्यवसाय असणारांना महिन्याच्या उत्तरार्धात अडचणी, अडथळे दूर करूनच प्रगतीसाठी, यशासाठी व अर्थप्राप्तीसाठी झगडावे लागेल. दलाली, कमिशनचा व्यवसाय असणारांना काळ लाभदायक होईल. या राशीच्या विद्यार्थ्यांना या महिन्याचा संपूर्ण काळ प्रतिकुल असल्यामुळे काही कारणाने जडत्व येणे, काही करू नयेसे वाटणे, मानसिक थकवा येणे अशापैकी कारणानी शैक्षणिक प्रगती साधणे अशक्य होईल. तसेच या राशीच्या मंडळीना कौटुंबिक त्रास व अन्य विविध कारणांनी अपेक्षित कौटुंबिक सुख व संततिसुख लाभणे अशक्य होईल. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. या राशीच्या काही भाग्यवंत मंडळीना परदेशगमनाचे योग येतील. श्रद्धा असेल तर मन:शान्तिसाठी श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल.

**(४) कर्क** - या राशीच्या मंडळीना या महिन्याचा संपूर्ण काळ फ़ारसा अनुकुल नाही, असेच म्हणावेसे वाटते. रवि-मंगळ हे दोन्ही उष्ण प्रकृतीचे ग्रह प्रतिकुल असल्यामुळे अपार शारीरिक कष्ट सहन करावे लागतील व त्यामुळे हाडमोड होणे, उष्णता भडकून मूळव्याधीसारखे उष्णताविकारांचे आजार होण्याची शक्यता दिसते. तसेच वीज, पाणी यांपासून धोका संभवतो. त्यामुळे पाण्याशी संबंधित नोकरी-व्यवसाय असणारांनी विशेष काळजी घ्यावी. शक्यतो प्रवास टाळा. प्रवासात त्रास होणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात घरीदारी, नोकरीव्यवसायात मनस्ताप देणाऱ्या घटना घडतील. मनावर संयम ठेवा, सहनशील व्हा म्हणजे शुभ ग्रहांच्या अनुकुलतेमुळे होणारा मनस्ताप सुसह्य होईल. बुध ग्रहाच्या अनुकुलतेमुळे हाती घेतलेल्या बौद्धिक कार्यात यश मिळेल व प्रगती होईल. तर शुक्राच्या अनुकुलतेमुळे या राशीच्या काही भाग्यवंत मंडळीना भूमिलाभ, धनलाभ, प्रतिष्ठा लाभून भरभराट होणेही संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात शुक्र ग्रह या राशीच्या भाग्यस्थानी गेल्यावर काही मंडळीना थोरकृपा प्राप्त होईल, काहींना सज्जनसंगतीचा लाभ होईल तर काही मंडळीना कीर्ती, प्रसिद्धी प्राप्त होणेही शक्य आहे. या राशीच्या मंडळींनी सध्या आहे ती नोकरीच प्रामाणिकपणे करावी. नवे काही करण्याच्या मोहाला बळी पडू नये. राहू-शनि प्रतिकुल असल्याने स्थावरसंबंधी वाद, कुटुंबात अनिष्ट घडणे, भांडणे, मातेस त्रास, न पटणे अशापैकी कारणांनी या राशीच्या मंडळीना कौटुंबिक सुखसमाधान व गृहसौख्य लाभणे अशक्य होईल. संयमाने आचरण करा.

**(५) सिंह -** या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या संपूर्ण काळात रवि, मंगळ, बुध, हर्षल व नेपच्यून हे पाच ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असणार आहेत. शिवाय शुक्र ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात काही प्रमाणात प्रतिकुल होईल. त्यामुळे दांपत्यजीवनात गैरसमज, वाद यांमुळे मनस्ताप सहन करावा लागेल. तसेच मुलांपैकी कोणाच्या व जीवनसाथीच्या अनारोग्याची चिंता उत्पन्न होणे संभवते. जपा. हा काळ आरोग्यविघातक असाच असण्याची दाट शक्यता दिसते. ताप येणे, अपचन होणे, पोटाचे विकार किंवा मूत्राशयविकार बळावणे, शारीरिक उष्णता भडकून मूळव्याधीसारखे उष्णताविकार बळावण्याची शक्यता दिसते. त्यात शारीरिक-मानसिक कष्टांची भर पडून थकावट जाणवेल. जपा. सर्व आचरण

सावधानतेनेच करा. इजा होणे , हाड मोडणे संभवते. पाण्याशी सतत संबंध असणाऱ्या या राशीच्या मंडळीनी वीज-पाणी यांपासून व सर्व प्रकारच्या अपघातापासून जपावे. दिनांक १-२ व दिनांक २८-२९ या चार दिवसांत विशेष जपावे. भावंडसुखात बाधा निर्माण होणे संभवते. अशा प्रतिकुल परिस्थितीतही पराक्रमस्थानी असलेल्या राहूमुळे उत्साह वाढेल व हातून काही कर्तबगारी घडेल. पण "नाही ते आहे" असे दाखविण्याचा प्रयत्न अंगाशी येईल. जपा. शनिमुळे या राशीच्या काही मंडळीना उत्तम नोकरी वा नवे कार्यक्षेत्र मिळेल. दशम स्थानी असेलेल्या गुरु ग्रहामुळे वकिली, अकौन्टन्सी, शास्त्रीय संशोधन अशापैकी बौद्धिक कार्यक्षेत्र असणाऱ्या या राशीच्या मंडळीना काळ अनुकुल, प्रगतिकारक व विविध प्रकारचे लाभ देणारा असाच सिद्ध होईल. कुलदैवत व श्रीगजानन उपासना अनुकुल होईल.

**(६) कन्या -** या राशीच्या मंडळींचे शनि ग्रहाच्या साडेसातीचे अखेरचे अडीचके चालू आहे. त्यामुळे अजूनही त्यांनी मनावर संयम ठेवून व सहनशील बनूनच सर्व आचरण केले पाहिजे. तसेच या महिन्याची ग्रहस्थितीही बरीचशी प्रतिकुल अशीच असणार आहे. केवळ रवि ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात आणि बुध-गुरु हे दोन ग्रह संपूर्ण महिनाभर अनुकुल असणार आहेत. महिन्याच्या पूर्वार्धात आरोग्य उत्तम राहील; पण महिन्याच्या उत्तरार्धात शारीरिक उष्णता भडकून उष्णतेचे विकार बळावण्याची शक्यता दिसते. इजा होणे. ताप येणे, फ़ोड येणे, रक्तविकार, पोटविकार, मूत्राशयविकार बळावणे, अपचन होणे अशापैकी आजार त्रस्त करण्याची शक्यता वाटते. हृदयविकार असणारांनी तर अति विचार न करता मन अगदी शांत राखण्याचा प्रयत्न करावा. राहू-शनिमुळे कौटुंबिक सुखात व हर्षल-मंगळामुळे दांपत्यजीवनातील सुखात विविध कारणांनी बाधा येणे संभवते. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी संशयाने, गैरसमजाने किंवा मतभेदाने भागीदारीत बाधा उत्पन्न होणार नाही याची काळजी घ्यावी. कोर्ट प्रकरणे असतील तर ती पुढे ढकलण्याचा प्रयत्न करावा. महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या व्यापारीमंडळीना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल होणार असल्याने जे काही साधावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा प्रयत्न करावा. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेमुळे नव्या संधी प्राप्त होतील. प्रवास योग येतील व अध्यात्माची ओढ असेल तर आध्यात्मिक प्रगती होण्यास काळ अनुकुल होईल. श्रद्धा असेल तर हनुमान उपासना अनुकुल होईल.

**(७) तुळा -** या राशीच्या मंडळींना शनि ग्रहाची साडेसाती आहेच. मन अत्यंत भावनाशील राहील. सतत मनाविरुद्ध अपमानास्पद घटना घडतील, नियोजित कार्यात अडथळे येतील व त्यामुळे गहरे नैराश्य येणे संभवते. कुटुंबसदस्यांपैकी कोणाचे स्थलांतर झाल्यामुळे मन अस्वस्थ होईल. तसेच स्वत:च्या, जीवनसाथीच्या व मुलांपैकी कोणाच्या अनारोग्याची चिंता निर्माण होणे संभवते. रक्तविकार व हृदयविकार असणारांनी तर मन विचारशक्ती शांत राखली पाहिजे. महिन्याच्या पूर्वार्धात नोकरीत वरिष्ठांचा त्रास सहन करावा लागेल. सतत सावधानतेने आचरण करा. अपघात भय संभवते. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी विशेष जपावे. चोरी किंवा अन्य कारणाने अर्थहानी होणे संभवते. जपा. महिन्याच्या पूर्वार्धात शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेमुळे थोडे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. कौतुक होईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात हाच शुक्र प्रतिकुल होईल. मन व बुद्धी अस्थिर, चंचल राहील. काही मंडळीना मुदतीचे ताप, तर काहीना असह्य डोकेदुखीचा त्रास होणे संभवते.

शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना महिन्याचा उत्तरार्ध अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल व प्रगतिकारक होईल. ज्यांच्या जन्मकुंडलीत योग असेल त्यांना अचानक धनलाभ वा वारसा हक्काने धनलाभ होण्याची शक्यता दिसते. अध्यात्मात रुची असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक उन्नती साधणे शक्य होईल. श्रद्धा असेल तर श्रीगजानन व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व थोडे मनस्वास्थ्य लाभेल.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात रवि-मंगळ-शनि हे तिन्ही ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असणार आहेत. त्यामुळे कौटुंबिक जीवनात त्रास, भांडणे, गैरसमज, असमाधानकारक घटना यांमुळे नातेसंबंधात दुरावा निर्माण होणे संभवते. या राशीच्या काही मंडळीना राहत्या जागेची समस्या त्रस्त करील तर काही मंडळीना स्थावरसंबंधी त्रास सहन करावा लागेल. महिन्याच्या उत्तरार्धात छुप्या शत्रूंचा त्रास होणे संभवते. जपा. संततिविषयक समस्या त्रस्त करील. मुलांचे तापदायक वर्तन, मनाविरुद्ध आचरण, अनारोग्य अशा कारणांनी असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. या काळात आर्थिक व्यवहार सावधानतेने व जपून करावेत. दिनांक ३-४ व दिनांक ३०-३१ या चार दिवशी विविध कारणांनी असह्य मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. काही मंडळीना कोर्टलचांडाला सामोरे जावे लागेल. अशा प्रतिकुल काळात बुध-गुरु-शुक्र या तिन्ही शुभ ग्रहांच्या अनुकुलतेमुळे मित्रसुख मिळेल. मधून मधून कुटुंबात मनोनुकुल घटना घडतील व त्यामुळे सुख-समाधान लाभेल. शेतीवाडी असणारांना शेतीवाडीपासून अपेक्षेपेक्षा अधिक लाभ होईल. अर्थलाभ होईल. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेमुळे नवे स्नेहसंबंध जुळतील. प्रवासयोग येतील. या राशीच्या विवाहेच्छू युवकयुवतींचे विवाह ठरतील व संपन्न होतील. काही भाग्यवान मंडळीना परदेशवारीचे योग येतील. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल. नियमितपणे हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(९) धनु -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा पूर्वार्ध अतिशय मनोनुकुल व लाभदायक असा असणार आहे. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना आपले कर्तृत्व सिद्ध करण्यास संधी मिळेल. त्याचा लाभ उठवा. त्यामुळे वरिष्ठ अधिकारी प्रशंसा करतील. या राशीच्या काही कर्तृत्वसंपन्न मंडळीना बढती, उच्च पद, मानाचे स्थान असे काही प्राप्त होणे संभवते व त्यामुळे समाजात प्रतिष्ठा वाढेल. महिन्याच्या पूर्वार्धात सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राहील. अर्थलाभ होईल. महत्त्वाकांक्षा वाढेल. काही भाग्यवान मंडळीना भूमिलाभ होणेही संभवते. उच्च बौद्धिक कार्यक्षेत्र व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना, शिक्षणक्षेत्रात कार्यरत असणारांना, वकिली, सल्लागारी व्यवसाय असणारांना महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. मात्र हाती अधिकार आला त्याचा गैर फ़ायदा घेऊन अर्थप्राप्ती करण्याचा मोह अंगाशी येईल, हे ध्यानात ठेवा. कारण छुप्या शत्रूंचा त्रास होण्याची दाट शक्यता आहे. जपा. सध्या या राशीच्या मंडळींचे मन अत्यंत भावनाशील असे झाले असावे, असे वाटते. त्यामुळे अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे अध्यात्मिक उन्नती व मन:शांती मिळविणे सहज शक्य होईल. काही मंडळीना जलप्रवासाचे योग संभवतात. महिन्याचा उत्तरार्ध मात्र राहत्या जागेविषयी समस्या, स्थावरसंबंधी समस्या, गैरसमजाने होणारे कौटुंबिक भांडणतंटे, असमाधानकारक घटना घडणे, नियोजित कार्यात दिरंगाई होणे, अनारोग्य

होणे, अनपेक्षित खर्च होणे अशापैकी विविध कारणांनी कौटुंबिक सुखात बाधा निर्माण होणे संभवते. पण शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेने शेतीवाडी असणारांना मात्र अपेक्षेपेक्षा अधिक अर्थलाभ होईल व कौटुंबिक सुखात येणाऱ्या बाधा सुसह्य होतील. या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे निर्माण होणे संभवते. तसेच या राशीच्या मंडळीना संततिविषयक समस्येला सामोरे जावे लागेलसे दिसते. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने आरोग्य उत्तम राहील. गुरु दत्तात्रेयावर श्रद्धा ठेवा.

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या दिनांक १-२, ७-८ आणि २८-२९ अशा सहा दिवसांत काही अविस्मरणीय अनुकुल/प्रतिकुल अनुभव येणे संभवते. महिन्याचा पूर्वार्ध या राशीच्या मंडळीना अत्यंत प्रतिकुल असाच असणार आहे. वाढता खर्च, वित्तहानी, फ़सवणूक, अनपेक्षित आर्थिक जबाबदाऱ्या, कष्ट-परिश्रमाने अर्थप्राप्ती, त्यामुळे शारीरिक उष्णता भडकून होणारे उष्णताविकार, आप्तेष्ट भांडणे, अन्य चिंता अशापैकी कारणांनी त्रस्त व्हाल. पण शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व कौटुंबिक सुखाला फ़ारसा तडा जाणार नाही. महिन्याच्या उत्तरार्धात मात्र या राशीच्या सर्वांनाच एकूण ग्रहस्थिती खूपच अनुकुल असणार आहे. उच्च बौद्धिक कार्यक्षेत असणारांना गहन गूढ असे काही प्रश्न सोडविण्यात यश प्राप्त होईल. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळींना आपले कर्तृत्व सिद्ध करण्याची संधी मिळेल. तसे घडल्यास वरिष्ठांच्या कौतुकास पात्र व्हाल. त्यामुळे बढतीसारखे विविध प्रकारचे लाभ होतील. महत्त्वाकांक्षा वाढेल. प्रवासयोग येतील. काही भाग्यवंतांना परदेशगमनाची संधी मिळेल. काही मंडळीना धनलाभ तर काहीना भूमिलाभ होणे शक्य आहे. वकिली सल्लागारी व्यवसाय असणारांना, कोळसा विक्रेत्यांना, कलाक्षेत्र व शिक्षण क्षेत्रात कार्यरत असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. शुभ ग्रह गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने कौटुंबिक व वैवाहिक सुख समाधान लाभेल. प्रेमसंबंध व स्नेहसंबंध वाढतील. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल. . काही मंडळीना काल्पनिक चिंतांचा त्रास होईल. विषभय आहे. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल.

**(११) कुंभ** - सध्या या राशीच्या मंडळींचे मन अत्यंत कोमल झाले असावे, असे वाटते. त्यामुळे मानसिक संवेदना शीघ्र होत असून जरा काही मनाविरुद्ध घडले की लगेच गहरे नैराश्य येत असावे, असे वाटते. अशा परिस्थितीत या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ फ़ारसा अनुकुल नाही, असेच म्हणावेसे वाटते. रवि-मंगळ-बुध-हर्षल हे चार ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असणार आहेत. त्यामुळे या राशीच्या मंडळीनी जिभेला लगाम घालून, मनावर संयम ठेवून व अत्यंत सहनशील बनूनच प्रतिकुल काळाशी मुकाबला केला पाहिजे. अशा विपरीत काळात गुरु-शुक्रासारख्या शुभ ग्रहांचे साहाय्य मधून मधून मिळेल, मनोनुकुल घटना घडतील व विपरीत काळ सुसह्य होईल. सध्या या राशीच्या मंडळींचा स्वभाव हट्टी, मानापमान फ़ार असा झाला असावा, असे वाटते. त्यात या विपरीत काळात अति श्रम व दगदग झाल्याने शारीरिक-मानसिक आरोग्यावर परिणाम होऊन थकावट जाणवेल. उष्णताविकार बळावतील. नेत्रविकार, घसा, मान, दाढा दुखणे असे आजार होणे संभवते. सतत मनाविरुद्ध घटना घडतील व असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. नियोजित कार्यात अडथळे येणे, अनपेक्षित आर्थिक जबाबदाऱ्या पूर्ण करण्याची चिंता लागणे, फ़सवणूक होणे, अपेक्षित अर्थप्राप्तीसाठी कष्ट-परिश्रम करावे लागणे, यांमुळे या राशीची काही मंडळी त्रस्त होतील. त्यात

भर पडून आप्तेष्ट भांडणे, नातेवाईक मंडळींकडून दिला जाणारा मनस्ताप यांची भर पडण्याची शक्यता दिसते. पण गुरु ग्रहाच्या अनुकुलतेमुळे कौटुंबिक सुखस्वास्थ्य लाभेल. या राशीची काही मंडळी स्थावर खरेदी-विक्री करण्याची शक्यताही दिसते. या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. दूरचे प्रवासयोग संभवतात. मन:शक्तीसाठी या राशीच्या मंडळीनी अध्यात्मिक उपासनेत लक्ष घालावे, असे आवर्जून सांगावेसे वाटते.

**(१२) मीन -** या राशीच्या मंडळींचा स्वभाव सध्या अथिर, लहरी, चंचल असा झाला असावा, असे दिसते. कसलेही दडपण, धाक, सहन होत नसावा. या राशीची लहान मुले तर अत्यंत हूड व व्रात्य झाली असावीत, असे वाटते. अशा परिस्थितीत या महिन्याच्या संपूर्ण प्रतिकुल काळात ही मंडळी कसा टिकाव धरू शकतील ? असा प्रश्न मनात येतो. पण महिन्याच्या उत्तरार्धात गुरु-शुक्राच्या शुभ योगामुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. महिन्याच्या पूर्वार्धात आर्थिक चिंता, गैर समजुती, भांडणे, जुन्या दबलेल्या प्रकरणांचा पुन्हा त्रास, मानहानी, अस्वस्थ मन, भावंडांकडून होणारा त्रास, यांमुळे असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे गहरे नैराश्य येणे शक्य आहे. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी प्रयत्नपूर्वक मन व विचारशक्ती शांत राखण्याचा प्रयत्न केला पाहिजे. शुभ ग्रहांच्या अनुकुलतेने वैवाहिक जीवनात व कौटुंबिक जीवनात सुखसमाधान लाभेल. या राशीच्या साहित्यिकांचे साहित्य ग्रंथरूपाने प्रकाशित होईल. शास्त्रीय संशोधनकार्यात कार्यरत असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. गुप्त पोलिस खात्यात नोकरी असणारांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या ज्या मंडळीना सहज वाम मार्ग धन मिळणे शक्य असले तरी त्यांनी तो मोह टाळावाच. बौद्धिक व शैक्षणिक कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. श्रद्धा असेल तर दररोज " बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे " पठण करा.

=====00000=====